# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रायगड जिल्ह्यातील सन २००५ मध्ये झालेल्या दासगांव येथील दरडग्रस्तांच्या पुर्नवसनाबाबत**

**(१) ८६० (२३-१२-२०१४). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील सन २००५ मध्ये झालेल्या दासगांव येथील दरडग्रस्तांचे पुर्नवसन १४ वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापि प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित पुर्नवसनाच्या प्रश्नाबाबत केव्हापर्यंत निर्णय होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१५) :** (१) व (२) मौजे दासगाव येथे दरड कोसळल्यामुळे २२३ कुटुंबे बाधीत झालेली होती त्यापैकी १२७ कुटुंबे पुनर्वसनासाठी तयार झाल्याने मौजे दासगाव येथे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत १-९०-६० हे.आर. खाजगी जमीन भुसंपादन करण्यात आलेली आहे. पुनर्वसनासाठी भुसंपादीत करण्यात येणाऱ्या जमीन मालकाचा जमीन देणेसाठी विरोध असल्याने शासनामार्फत एकतर्फी ताबा घेणेबत येऊन १०२ आपदग्रस्तांना भुखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.

९४ आपदग्रस्तांना पहिल्या हप्त्याची रक्कम रु. १८,८०,०००/- अनुदान वाटप केलेले असून, त्याचेकडून विनियोग दाखले प्राप्त होताच दुसऱ्या हप्त्याचे अनुदानाची व मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे अनुदान वाटप करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**'चासकमान' आणि भामा-आसखेड धरण प्रकल्पग्रस्तांचे पूनर्वसन करण्याबाबत**

**(२) १५७१ (२४-१२-२०१४). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'चासकमान' आणि भामा-आसखेड धरण प्रकल्पग्रस्तांचे पूनर्वसन लवकर करण्यात यावे असे निर्देश उच्च न्यायालयाने शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यानुषंगाने आतापर्यंत किती प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले आहे व अद्याप किती प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन करणे बाकी आहे,

(३) सदरहू प्रकल्पाग्रस्तांचे पुनवर्सन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-१२-२०१५) :**(१) चासकमान व भामा आराखेड प्रकल्पग्रस्तांच्या याचिकांमध्ये मा. न्यायालयाने प्रकरणानुसार वेगवेगळे आदेश पारीत केले आहेत.
(२) व (३) I) चासकमन प्रकल्पातील एकुण २८ प्रकल्पाग्रस्तांना व भामा - आराखेड प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जमीन वाटप करण्यात आली आहे.
II) मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशनानुसार पात्रता तपासून चासकमान प्रकल्पातील एकुण ३२ अपात्रे प्रकल्पग्रस्तांची व भागा आराखेड प्रकल्पातील १०५ अपात्र प्रकल्पग्रस्तांची मागणी अमान्य करण्यात आली आहे.
III) मा.उच्च न्यायालयाने कलम ६६(२) नोटीस द्यावी असे आदेश दिलेल्या २९७ प्रकरणामध्ये "सिव्हील ॲप्लीकेशन" दाखल करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील भातकुली, अमरावती व इतर तालुक्यामध्ये पेठी प्रकल्पाच्या काठावर असलेल्या पेठी नदीला आलेल्या महापूरामुळे हजारो घरे जमिनदोस्त झाल्याबाबत**

**(३) १७३३ (२३-१२-२०१४). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील भातकुली, अमरावती व इतर तालुक्यामध्ये पेठी प्रकल्पाच्या काठावर असलेल्या पेठी नदीला आलेल्या दिनांक २२ व २३ जुलै रोजीच्या महापूरामुळे हजारो घरे जमिनदोस्त होऊन, अतिवृष्टीमुळे हजारो घरे जमिनी पाण्याखाली आल्याने पिके वाहून गेली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेठी काठावरील जी घरे वाहून गेली व शेती पिकांचे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्त लोकांना शासनाने अनुदान दिले वा देणार आहे या बाबत काय कार्यवाही केली,
(३) विशेषत: पेठी प्रकल्पातील शेतकऱ्यांना लाभ देण्याबाबत विशेष अनुदान देणार आहे काय?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१५) :**(१), (२) व (३) हे अंशत: खरेआहे.

अमरावती तालुक्यात घरांची पुर्णत: पडझड झाल्याने एकूण ३२२ बाधितांना रु.३७५३००/- सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे. ११९ घरांचे घरमालकांना रु.२३७३५२/- आर्थिक सहाय्य अनुदान वाटप करण्यात आले आहे. उर्वरित अनुदान वाटपाची कार्यवाही जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयामार्फत सुरु आहे.

भातकुली तालुक्यामध्ये रु. ५ लाख अनुदान देण्यात आले होते. त्यापैकी रु. ४९८४५० वाटप करण्यात आले आहे.

---

**दूधगंगा प्रकल्पांतर्गत मौ.नानीवळ (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर)**
**प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) २८२७ (२३-१२-२०१४). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दूधगंगा प्रकल्पांतर्गत मौ.नानीवळ (ता.राधानगरी) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन सन १९८८-८९ साली मौ.खोची (ता.हातकणंगले, जि.कोल्हापुर) येथील गट नं.९९६ अ मध्ये भूखंड पाहून या ठिकाणी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त भागातील लोकांचे पुनर्वसन करतांना ६२ भूखंडांमध्ये ११२ कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००५ पासून या वसाहतीमध्ये अपूर्ण असलेल्या सुविधांबाबत व प्रत्येकांस स्वतंत्र भूखंड मिळणेबाबत मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौ.खोची येथील गायरान गट नं.९९६ अ ग्रामपंचायतीच्या ताब्यात असून धरणग्रस्तांच्या मागणीनुसार शाळा, क्रिडांगण व प्रचलित सुविधांसाठी जागा वापरणेबाबतचा ना हरकत ठराव ग्रामपंचायतीने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त वसाहतीत इतर सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०३-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर पुनर्वसित वसाहतीत आठ नागरी सुविधा पुरविल्या आहेत. इतर नागरी सुविधांसाठी आवश्यक असलेले वाढीव भूखंडाचे नियोजन करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड तालुक्यातील (जि. रायगड) दहिवाड या गावात रात्रीच्या**
**वेळेस भूगर्भातून आवाज येत असल्याबाबत**

**(५) २८९२ (२३-१२-२०१४). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि. रायगड) दहिवाड या गावात जमिनीतून रात्रीच्या वेळेस भूगर्भातून आवाज येत असलेल्या आवाजामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले असल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी भूगर्भ तज्ञांकडून जमिनीची पाहणी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर येत असलेल्या आवाजामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०३-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. महाड तालुक्यातील दहिवाड या गावात माहे जुलै २०१३ व २०१४ मध्ये भूगर्भातून आवाज येत असल्याची घटना घडली होती. माहे ऑक्टोबर २०१४ मध्ये अशी बाब निदश्रनास आलेली नाही.

(२), (३) व (४) भूगर्भ तज्ञांकडून जमिनीची पाहणी करण्यात आली आहे तसेच, संचालक , वरीष्ठ भूवैज्ञानिक, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग, पुणे वरीय्ठ भूवैज्ञानिक , भूवजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, रायगड-अलिबाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकार, रायगड-अलिबाग आणि तहसिलदार, महाड यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन करुन ग्रामस्थांना मनातील भीती दूर केली. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाकडील तज्ञ व्यक्तींकडून सदरील पाहणी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गारपीट व अवेळी पडणा-या पावसापासुन होणारे नुकसान टाळण्यासाठी शेड नेटचा वापर प्रायोगिक तत्वावर नाशिक जिल्ह्यात राबविणार असल्याबाबत**

**(६) ६३४४ (०८-०३-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गारपीट व अवेळी पडणा-या पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी शेड नेटचा वापर प्रायोगिक तत्वावर नाशिक जिल्ह्यात राबविणार असल्याचे मा. कृषी मंत्री महोदयांनी दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी जाहीर केले, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, गोदामाच्या बांधकामासाठी १०० टक्के अनुदान देणार असल्याचे जाहीर केले हे खरे आहे काय ?

(३) असल्यास, फळउत्पादनाला चालना देण्यासाठी फळ प्रक्रिया उद्योगाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत जाहीर केले खरे आहे काय ?

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुना धरणाच्या उभारणीमुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या शासन स्तरावर प्रलंबित असल्याबाबत

**(७) ९३८३ (०७-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील पाचल येथील अर्जुना धरणाच्या उभारणीमुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या शासन स्तरावर गेली अनेक वर्षे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण ग्रस्तांसाठी राखीव ठेवण्यात आलेली मोक्याच्या जागा बळकावण्यासाठी जमीन माफियांची दादागिरी सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३)असल्यास,याबाबत संबंधित पोली, महसूल यंत्रणेकडे पाचल पंचक्रोशीवासीयांनी लक्ष वेधूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास,तद्नुसार उक्त धरणाच्या विस्तपित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यासंदर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

अर्जुना मध्यम प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित गावठाणामध्ये अधिनियमातील तरतुदीनुसार देय सर्व नागरी सुविधा पुरविण्यात आल्या असून, सदर सुविधा देखभालीसाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूकंपग्रस्तांचे पुनर्वसनासाठी वाढीव मावेजा न्यायालयात भरण्यात न आल्याबाबत

**(८) १०९१६ (०७-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांगवी (जेवरी) ता.निलंगा, जि.लातूर येथील भूकंपग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादीत जमीनीसंदर्भात मा.जिल्हान्यायाधि-१, निलंगा यांनी भूसंदर्भ क.५/२००१ व इतर १० मध्ये दिनांक २८ एप्रिल, २०१० रोजी आदेश पारित करुन १ कोटी ८५ लाख ३३ हजार १९२ फक्त इतकी रक्कम मंजूर करुन वाढीव मावेजा न्यायालयात भरण्यात यावा असे आदेश दिल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्याचेकडील पत्र क्र. २०१२/भूसं

/समन्वय /सीआर-२४, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ अन्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे तद् नंतर विभागीय आयुक्ताने त्यांचेकडील पत्र क्र. २०१३/ एलक्यूएन/कक्ष-१ / सीआर १७, दिनांक ६ मार्च, २०१३ अन्वये प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांचेकडे मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आजमितीस सदरहू प्रस्तावानुषंगाने शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, लातूर यांनी सादर केलेल्या सदरहू प्रस्तावानुसार निधी उपलब्ध करुन देत असलेल्या तारखेपर्यंत व्याजाची आकारणी करुन सुधारित हिशोबाप्रमाणे निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२९-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) अद्ययावत परिगनणेसह निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिक्षा चालविण्याच्या परवान्यासाठी शैक्षणिक पात्रतेत वाढ करण्याबाबत**

**(९) १०९४९ (०७-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडत आहे बदलत्या काळानुसार सर्वच ठिकाणी शैक्षणिक पात्रतेत वाढ होऊ लागली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता रिक्षा चालविण्याच्या परवान्यासाठ किमान १० वी पास असलेल्यांनाच परवाने मिळणार आहेत असे आदेश प्रादेशिक परिवहन विभागाने काढले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशानुसार शासनाने रिक्षा परवाने देण्यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-१२-२०१५) :**(१) ऑटोरिक्षा परवान्यांचे वाटप करताना अर्जदार १० वी इयत्ता उत्तीर्ण असावा, तथापि पुरेशा संख्येने १० वी उत्तीर्ण उमेदवारांकडून अर्ज आले नाहीत, तर उर्वरित परवान्यांच्या वाटपाकरीता उमेदावार किमान ८ वी इयत्ता उतीर्ण ही अट राहील, असा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतला आहे.
(२) व (३) सन २०१४ मध्ये परवान्यांच्या वाटपाकरीता काढलेल्या सोडतीमध्ये वर नमूद अटीनुसार दहावी उत्तीर्ण असलेले ५१,१४७ व आठवी उत्तीर्ण असलेले ९,५५७ उमेदवार यशस्वी झाले आहेत.

---

**धान उत्पादकांना उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्याबाबत**

**(१०) ११११५ (१०-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धान उत्पादकांना उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्यात यावा, या मागणीचे निवेदन माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्र्यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मागण्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप याबाबत निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) :**(१) होय.

(२) धानाला हमीभाव देणे, ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. सन २०१४-१५ करिता राज्य शासनाने (सर्वसाधारण प्रत) धाना करिता रु.२७७०/- (प्रति क्विंटल) इतकी शिफारस केलेली होती. परंतु केंद्र शासनाने रु.१३६० (प्रति क्विंटल) अशी हमी भाव किंमत जाहीर केली. धानाला वाजवी हमीभाव मिळावा महणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते. सदर वस्तुस्थिती सन्माननीय लोकप्रतिनिधींना कळविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील मौजे अहिरे (ता.हवेली) येथील स्थानिक कुटुंबांचा पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या २०-२५ वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(११) १२०१२ (०७-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मौजे अहिरे (ता.हवेली) येथील स्थानिक कुटुंबांचा पुनर्वसनाचा प्रश्न गेल्या २० ते २५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तेथील कुटुंबांचा सन १९८९ मध्ये पुनर्वसनाचा निर्णय झाला, हे ही खरे आहे काय, असल्यास, किती कुटुंबांचा पुनर्वसनाचा निर्णय झाला आहे, त्यापैकी किती कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले आहे,

(३) ग्रामपंचायत दफ्तरी नोंद असलेल्या ग्रामपंचायत मिळकत क्र. ८ ड उताऱ्यानुसार पुनर्वसनाचा निर्णय झाला आहे काय, असल्यास २७२ कुटुंबांना पुनर्वसनाचा न्याय देणे बंधनकारक आहे काय, असल्यास तसा निर्णय झाला काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) सदर आदेश १९८९ मधील नसुन दिनांक ०४.०५.१९९१ रोजी १५१ कुटुंबियांना प्लॉट देण्याचे निश्चित झाले आहे व त्याप्रमाणे १५१ कुटुंबियांना प्लॉटचे ताबे दिले आहे.

(३) ग्रामपंचायत मिळकत ८ "ड" नुसार पुनर्वसनाचा निर्णय झालेला नसुन सन १९५२ साली अहिरे गावठाणचे संपादन झाले असुन तो निवाडा गृहीत धरुनच प्लॉट वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**आकोट (जि.अकोला) कृषी विभागामार्फत संत्रा विकासाठी तालक्यातील बहुतांश बागायती शेतक-यांनी ठिबक सिंचना साठी अल्पभुधारक व अत्यल्प भुधारक योजनेतून अनुदान प्राप्त झाले नसल्याबाबत**

**(१२) १२७८६ (०८-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोट (जि.अकोला) कृषी विभागामार्फत संत्रा विकासाठी तालक्यातील बहुतांश बागायती शेतक-यांनी ठिबक सिंचना साठी अल्पभुधारक व अत्यल्प भुधारक योजनेत अनुदान मागणीसाठी अर्ज सादर करुन गेल्या पाच महिन्यापासून शेतक-यांना सदर योजनेतून अनुदान प्राप्त झाले नसल्याने माहे जानेवारी, २०१५ वा त्यासुमारास शेतक-यांनी जिल्हा कृषी अधिकारी उपोषन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नविन दरपत्रकानुसार सिंचनाने अनुदान मागणी केली तद् नुसार स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी यांना माहे जानेवारी, २०१५ दरम्यान लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतकऱ्यांच्या निवेदन व अनुदान देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू अनुदान तातडीने देण्याचे दृष्टीने राज्य शासन कोणती कार्यवाही करणार वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-१२-२०१५) :**(१) श्री. रविंद्र कृष्णराव कोल्हे यांचे अनुदान न मिळाल्याने उपोषण करण्याचे निवेदन प्राप्त झाले होते.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) श्री. रविंद्र कुष्णराव कोल्हे यांना दि. १४ मे, २०१५ रोजी देय असलेल्या अनुदानाची रक्कम अदा करण्यात आली असून सन २०१४-१५ च्या अनुदानाच्या अदायगीची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्वत्र गावांची आणेवारी ५० टक्क्याच्या आत असण्याच्या पार्श्वभूमीवर सक्तीने कर्जवसुली न करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय**

**(१३) १५४०४ (१७-०४-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वत्र गावांची आणेवरी ५० टक्क्याच्या आत असणाऱ्या कर्जवसुली न करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे  हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयावर मात करून केंद्र शासनाच्या कर्ज वसुली प्राधिकरणाने वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी परस्पर ऑनलाईन विक्री केल्याची धक्कादायक बाब दिनांक १० फेब्रूवारी २०१५ रोजी वा त्यासुमरास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने राज्य शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) या प्रकरणाची अद्याप चौकशी केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०९-२०१५) :**(१) ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या भागात टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर करुन देण्यात येणाऱ्या विविध सवलतींमध्ये शेतीशी निगडीत कर्ज वसुलीस स्थगिती देण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे. माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वर्धा जिल्ह्यात ०२ प्रकरणी जमीनी परस्पर ऑनलाईन विक्री केल्याची बाब निदर्शनास आली आहेत.

(३) ऑनलाईन विक्री केलेल्या ०२ जमिनीच्या फेरफाराची नोंद घेण्यात आलेली नाही. याबाबत तहसलिदार समुद्रपुर यांच्या कार्यालयात विवादास्पद प्रकरण म्हणुन चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंद्रा धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावणेबाबत**

**(१४) १५४४३ (११-०५-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि. पुणे) तालुक्यातील आंद्रा धरणग्रस्त संघटनेने आपल्या विविध मागण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी पंचायतीसमोर धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना १२/२ च्या नोटीसा देऊनही त्यांना शासनाने वेतन दिलेले  नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणासाठी संपादित केलेल्या परंतू अतिरिक्त ठरलेल्या जमिनी मुळ शेतक-यांना परत कराव्यात, आंद्रा धरणातून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला पाणी देऊ नये आदी मागण्या करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(४) या धरणग्रस्तांच्या मागण्याबाबत त्वरीत कार्यवाही न झाल्यास आगामी काळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंद्रा धरणग्रस्त संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) आंद्रा धरणग्रस्तांच्या मागण्या बाबत शासन स्तरावर कोणता निर्णय झाला आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०१-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.
आंद्रा प्रकल्पग्रस्तांनी ८ जानेवारी, २०१५ रोजी असे आंदोलन केले होते.
(२) हे खरे नाही, उप जिल्हाधिकारी, भुसंपादन क्र. १३, पुणे यांचेकडुन आंद्रा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे. मात्र काही प्रकरणांमध्ये सहधारकांचे संमतीपत्र सादर नसल्याने ती प्रकरणे प्रलंबीत आहे.
(३) अतिरीक्त ठरलेल्या जमिनी परत द्याव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. तथापि, धरणासाठी अतिरीक्त जमीन संपादीत केल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच आंदोलनकर्त्यांची मागणी पिंपरी चिंचवड महापालिकेला बंद नलिकेतुन पाणी देऊ नये अशी आहे.
(४) व (५) निवेदनकर्त्यांच्या दिनांक ०४ जानेवारी, २०१५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी पुणे यांचे दालनात बैठक आयोजित करुन निवेदनकर्त्यांच्या मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

---

**चासकमान प्रकल्पातील जमीन भूसंपादनाबाबत**

**(१५) १६१७४ (०८-०३-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चासकमान प्रकल्पामध्ये जमीन भूसंपादन झालेल्या नागरिकांचे किती प्रकल्पग्रस्ताचे कायद्यानुसार पुनर्वसन करण्यात आले याचा अहवाल राज्य सरकारला ५ मार्च पर्यंत सादर करण्याचे उच्च न्यायलयाने निर्दे श दिल असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये उघड झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन करण्याचे शासन आदेश असूनही जिल्हाधिकारी आणि मा.मुख्य सचिव यांनी याकडे हेतपुरस्तर दुर्लक्ष केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, आजवर भूसंपादन झालेल्या शेतक-यांना पुनर्वसन व प्रकल्पग्रस्तांच्या लाभापासून वंचित ठेवल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) उक्त प्रकरणी दोषींवर कुठली कार्यवाही केली अथवा करण्यात येणार आहे काय, नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५)** :(१) मा. उच्च न्यायालय , मुंबई येथे दाखल असलेल्या, चासकमान प्रकलपग्रस्तांच्या याचिकांमध्ये मा. न्यायालयाने प्रकरणपरत्वे वेगवेगळे आदेश पारीत केलेले आहेत.
(२) व (३) चासकमान प्रकल्पातील एकुण २८ प्रकलपग्रस्तांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व पात्रता तपासून जमीन वाटप करण्यात आलेली आहे. तसेच चासकमान प्रकल्पातील एकुण ३२ अपात्र प्रकल्पग्रस्तांची मागणी अमान्य करण्यात आली आहे. तसेच मा.न्यायालयाने कलम १६(२) ची नोटीस द्यावी असे आदेश दिलेल्या २६ प्रकरणांमध्ये "सिव्हील ॲप्लीकेशन" दाखल करण्यात आलेले आहे. तसेच याच विषयाबाबत दाखल असलेल्या

जनहित याचिका क्र.१७१/२०१४ मधील मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सचिव (मदत व पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून तिथे कामकाज प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खान्देशात दरवर्षी रब्बी हंगामात शेतकरी गहू व हरबरा वगैरेची मोठ्या प्रमाणात लागवड करता दरवर्षी शेतक-यांना युरिया खत खूप कमी प्रमाणात दिले जात असल्याबाबत**

**(१६) १६५२४ (१२-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशात दरवर्षी रब्बी हंगामात शेतकरी गहू व हरबरा वगैरेची मोठ्या प्रमाणात लागवड करता दरवर्षी लागवड क्षेत्र व खतांची मागणी यांचा दांडगा अनुभव असूनही दरवर्षी शेतक-यांना युरिया खत खूप कमी प्रमाणात दिले जाते शिवाय वाहतुकीचा खर्च ही त्यांच्याकडून वेगळा वसूल केला जातो असे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांना पुरेसे युरिया खत उपलब्ध करुन देण्याचा दृष्टीने शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही. खान्देशातील शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात युरिया खत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरातील हार्बर आणि ट्रान्स हार्बरवरील रेल्वे रुळांलगत गटाराच्या पाण्यावर भाज्यांची लागवड केली जात असल्याबाबत**

**(१७) १६७७७ (०६-०८-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील हार्बर आणि ट्रान्स हार्बरवरील रेल्वे रुळांलगत गटाराच्या पाण्यावर भाज्यांची लागवड केली जात असल्याने शहरात साथींच्या रोगांची मोठ्या प्रमाणात

लागण होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रसायनमिश्रीत भाज्यांच्या सेवनाने नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये याकरीता तसेच रेल्वे प्रशासनाच्या जागेवर अनधिकृतपणे केल्या जात असलेल्या सदर शेतीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात खरीप हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तूर, कापूस व कांदा ही पिके वगळून अन्य पिकांसाठी नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१८) १८०९२ (०८-०९-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील खरीप हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तूर, कापूस व कांदा ही पिके वगळून अन्य पिकांसाठी विम्यापोटी ११३२ कोटी रूपयांची नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन असलेल्या बाबीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयांती शेतकऱ्यांना विम्याचे पैसे देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५)** :(१) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१४ मध्ये राज्यातील ३४.८७ लाख शेतकऱ्यांना एकुण रु. १५९५.६५ कोटी इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत मंजूर करयात आली आहे. त्यापैकी तूर, कापूस व कांदा ही पिके वगळून अन्य पिकांसाठीची नुकसान भरपाई रक्कम रु. ११३२.५५ कोटी इतकी आहे.

(२) व (३) एकुण नुकसान भरपाई रक्कम रु. १५९५.६५ कोटी (राज्य हिस्सा रक्कम रु.६९०.७४ कोटी, केंद्र हिस्सा रक्कम रु. ६९०.७४ कोटी व भारतीय कृषि विमा कंपनीचा हिस्सा रु.२१४.१७ कोटी) बँकामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यावर जून व जुलै २०१५ मध्ये जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमदनगर जिल्ह्यात तीन वर्षात तीन लाख माती नमुने तपासण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

**(१९) १८८५६ (०६-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमदनगर जिल्ह्यात तीन वर्षात तीन लाख माती नमुने तपासण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५) :**(१) केंद्र शासन पुरस्कृत जमिन आरोग्य पत्रिका अभियानांतर्गत अहमदनगर जिल्ह्यात २०१५-१६ पासून तीन वर्षात २८७६७४ माती नमुने तपासण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे.

(२) अहमदनगर जिल्ह्यात जमिन आरोग्य पत्रिका अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये ९५४६६ माती नमुने काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले असून आतापर्यंत ९२४२३ माती नमुने काढण्यात आलेले आहेत. त्यापैकी २१२८९ मातीनमुने तपासण्यात आलेले असून शेतकऱ्यांना ३२२३ जमिन आरोग्य पत्रिका वितरण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली तालुका कृषी (जि. रत्नागिरी) कार्यालयाच्या मंजूर असलेल्या एकूण ८४ पदांपैकी २५ पदे रिक्त असल्याबाबत

**(२०) १९५८९ (०६-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली तालुका कृषी (जि. रत्नागिरी) कार्यालयाच्या मंजूर असलेल्या एकूण ८४ पदांपैकी २५ पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांना तालुक्यातील १७६ गावांचे काम पहावे लागत आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुका कृषी कार्यालयाकरिता वरिष्ठ लिपिकाचे मंजूर असेलेले १पद रिक्त तर ४ लिपिक मंजूर असून केवळ १ लिपिक कार्यरत असून ३ पदे रिक्त आहेत, तसेच अनुरेखकाची मंजूर २ पदे असतांना ४ मंडळ कार्यालयातील प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ४ पदे मंजूर आहेत मात्र प्रत्यक्षात एकही अनुरेखकाचे पदे भरलेले नाही हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, एवढया मोठया प्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे कामाचा बोजा कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(६) असल्यास,चौकशीअंती सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५) :**(१), (२), (३) व (४) होय.

दापोली तालुका कृषी (जि.रत्नागिरी) कार्यालयाच्या मंजूर असलेल्या एकूण ८४ पदांपैकी २६ पदे सद्य:स्थितीत रिक्तआहेत. सदर रिक्त पदांचाअतिरिक्त कार्यभार नजीकच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना देवून त्याद्वारे कामकाज पार पाडले जात आहे जेणेकरून नागरिकांची गैरसोय होत नाही.
(५) व (६) गट “क” व “ड” संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे तातडीने भरण्याविषयी कालबध्द कार्यक्रम आखून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खरीप व रब्बी अशी वर्गवारी बंद करण्याचे शासनाकडे प्रस्तावित असल्याबाबत**

**(२१) २१३९५ (०६-०८-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांच्या शेतातील पीकांचे खरीप व रब्बी अशा दोन प्रकारात वर्गीकरण करण्यात येत असते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात झालेल्या सिंचनामुळे बहुतेक सर्वच स्थानी कमी जास्त प्रमाणात खरीप पिके घेतली जातात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिवृष्टी वा अवर्षणामध्ये शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची शासनामार्फत देण्यात येणारी नुकसान भरपाई रब्बीच्या गावांमध्ये फार उशीरा देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, खरीप व रब्बी अशी वर्गवारी बंद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.

राज्यातील पिकाखालील क्षेत्राशी तुलना करता बागायत क्षेत्राचे प्रमाण १७.६८ टक्के इतकेच आहे. लागवडीखालील क्षेत्रापैकी १४३.५६ लाख हे क्षेत्रावर खरीपाची, तर ६२.४३ लाख हे क्षेत्रावर रब्बी पिकांची लागवड करण्यात येते.

(३) नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई दिली जात नसून आर्थिक मदत दिली जाते. रब्बीच्या गावांमध्ये मदत उशीरा दिली जाते, हे म्हणणे खरे नाही.
(४) खरीप व रब्बी अशी वर्गवारी बंद करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) हवामानानुसार खरीप पिके व रब्बी पिके अशी वर्गवारी करण्यात आलेली असून ती बंद करण्याची आवश्यकता वाटत नाही.

---

## पाटण जि.सातारा तालुक्यातील तारळी धरण प्रकल्पातील निवडे पुर्नवसीत गांवातील १२ प्रकल्पग्रस्तांना पाल ता.कराड येथे गट नं.१७५० मध्ये जमिन वाटपाचा आदेश देवूनही सदरची जमीन अन्य प्रकल्पग्रस्तांना दिल्याची चौकशी करणेबाबत

**(२२) २१८९६ (०८-०९-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण जि.सातारा तालुक्यातील तारळी धरण प्रकल्पातील निवडे पुर्नवसीत गांवातील १२ प्रकल्पग्रस्तांना सन २००३ मध्ये पाल ता.कराड येथे गट नं.१७५० मध्ये जमिन करणेबाबत कराड प्रातांधिकारी यांनी आदेश जारी केले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या गट नं. मधील जमीन ताब्यात देणेबाबत संबंधित १२ प्रकल्पग्रस्तांनी सातत्याने प्रातांधिकारी कराड यांचेकडे मागणी करुनही अद्यापही सदरच्या जमिनीचा ताबा संबंधित प्रकल्पग्रस्तांना दिला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २००३ मध्ये १२ प्रकल्पग्रस्तांना सदरचे गट नं.१७५० मध्ये जमीन वाटपाचे आदेश काढूनही सन २००८ व २०११ मध्ये याच गट नं.१७५० मधील जमीन वाटपाचे आदेश तत्कालीन प्रातांधिकारी यांनी काढून राजकीय हेतूने सदर गट नं मधील जमीन १२ प्रकल्पग्रस्तांना न देता दोन प्रकल्पग्रस्तांना अनुक्रमे ९० व ४० गुंठे वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी १२ प्रकल्पग्रस्तांनी जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास,चौकशीअंती जमीन १२ प्रकल्पग्रस्तांना देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) उप विभागीय अधिकारी कराड यांनी निर्गमित केलेल्या सन २००३ च्या मौजे निवडे येथील गट नु. १७५० पैकी या जमीन वाटप आदेशांतील १२ प्रकल्पग्रस्तांपैकी ६ प्रकल्पाग्रस्तांना कब्जेपट्टी व ताबा देण्यात आलेला असून ७/१२ ला देखील नोंदी घेण्यात आल्या आहेत. सन २००८ मध्ये १० प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटपाचे आदेश निर्गमित करण्यात आले. तथापि, त्यापैकी २ प्रकल्पग्रस्तांना ८० आर क्षेत्राची कब्जेपट्टी, ताबा देऊन ७/१२ वर नोंद

घेण्यात आली आहे. तसेच सन २०११ मध्ये ५ प्रकल्पग्रस्तांना ८८ आर जमीन वाटपाचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि, त्यापैकी कुणालाही कब्जेपट्टी व ताबा देण्यात आलेला नाही किंवा ७/१२ वर नोंदही घेण्यात आलेली नाही.
(४) हे खरे नाही.
(५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणातील बांबा बागायतदारांच्या नुकसानीबाबतचा अहवाल तयार करण्याबाबत**

**(२३) २२२४६ (१२-०८-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील आंबा बागायतदारांच्या नुकसानीबाबतचा अहवाल तयार करण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी अप्पर कृषी सचिवांना दिल्याचे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबतचा अहवाल कृषी सचिवांकडून शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने अहवाल तयार करण्याबाबत तसेच आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५) :**(१) व (२) होय.
(३) राज्यात माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीच भरपाई देण्याबाबत महसूल व वन विभागाचा शासननिर्णय दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला असून त्य अनुषंगाने दिनांक २५ मे, २०१५ व २८ जुलै, २०१५ रोजी निधी वितरीत केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातून जाणाऱ्या सोलापूर ते जळगांव रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करण्याबाबत**

**(२४) २२४२५ (१०-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातून जाणा-या सोलापूर ते जळगांव रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण झालेले असून ते काम अद्याप मार्गी लागलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा रेल्वे मार्ग झाला तर महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानी वास्तव्य असलेले तुळजापूर रेल्वेच्या नकाशावर येणार आहे, त्याचबरोबर मराठवाड्यातील अनेकगावे रेल्वेला जोडली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील प्रवाश्यांची मागणी तसेच उस्मानाबाद सारख्या मागासलेल्या जिल्ह्यासाठी विकासाची गंगा म्हणून अपेक्षित असलेल्या या रेल्वे मार्गासाठी शासन स्तरावरुन काय पाठपुरावा केला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-१२-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) सदर प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल रेल्वे मंत्रालयास २५/३/२०१३ रोजी सादर करण्यात आला आहे. प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.३२३८ कोटी व वार्षिक परतावा दर (-) ५.६९% आहे. रेल्वे बोर्डाने प्रकल्प स्थगित ठेवला आहे. प्रकल्पास रेल्वे मंत्रालयाची अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

---

## राज्यातील चिपळूण-कराड हा लोहमार्ग पूर्ण करण्याबाबतचा प्रस्ताव

**(२५) २२४८४ (१०-०८-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चिपळूण-कराड हा लोहमार्ग लवकर पूर्ण करण्यासाठीचा प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाच्या विचाराधीन असून त्यांच्या सर्वेक्षणाचे कामही हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील लोहमार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणत्या प्रकाराचा पाठपुरावा केला आहे वा त्याची फलनिष्पती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-१२-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) सदर प्रकल्प पी.पी.पी तत्वावर कोकण रेल्वे महामंडळाद्वारे राबविण्यास रेल्वे मंत्रालयाची मंजूरी मिळालेली आहे. प्रकल्पाकरिता विशेष उपयोजिता वाहन (SPV) स्थापन करण्यासाठी कोकण रेल्वे महामंडळातर्फे कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## दोंडाईचा (जि.धुळे) येथे सब रजिस्टार व ट्रेझरी सुरु करण्याबाबत

**(२६) २२८०२ (०८-१०-२०१५). श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोंडाईचा (जि.धुळे) हे ब नगरपालिका असणारे ठिकाणी असून शहरात कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ, तालुका दुध संघ, वीज मंडळाचे विभागीय कार्यालय अशी तालुका स्तरावर असणारी सर्व महत्वाची कार्यालये असताना येथे सब रजिस्टर कार्यालय व ट्रेझरी कार्यालय नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोंडाईचा हे तालुक्याचे ठिकाण नसतांनाही शहरात असणाऱ्या विविध बँकींगच्या सुविधा उपजिल्हा रुग्णालय मोठी बाजारपेठ असल्यामुळे आजूबाजूच्या ५० पेक्षा अधिक गावांचा दैनंदिन संपर्क हा दोंडईचा शहराशी आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शहरात सब रजिस्टार व ट्रेझरी कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०१-२०१६) :** (१) व (२) होय, तथापि दुय्यम निबंधक, सिंदखेडा या कार्यालयाचे भेट कार्यालय आठवड्यातील प्रत्येक गुरुवारी दोंडाईचा येथे कार्यान्वित असते.
(३) दोंडाईचा पंचक्रोशीतील दस्तऐवजांची संख्या संगणकीकरणाच्या मानकानुसार अत्यंत कमी आहे व शासनाने तालुक्यासाठी स्वतंत्र एक कार्यालय असा उपक्रम राबविल्यामुळे व दोंडाईचा हे स्वतंत्र तालुक्याचे ठिकाण नसल्याने त्याठिकाणी दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील नगर तालुका कृषी अधिकारी यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत**

**(२७) २२८१६ (११-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील नगर तालुका कृषी अधिकारी श्री.दत्तात्रय रंभाजी राऊत यांनी केलेल्या गैरकारभाराबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (राहुरी) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ मार्च, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करित आहे,
(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०९-२०१५) :**(१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगर तालुका कृषि अधिकारी यांच्याविरुध्द मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १६/६/२०१५ रोजी निवेदन दिले आहे.
(२) व (३) वरील निवेदनाच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करीता अधिक्षक कृषि अधिकारी दक्षता पथक आयुक्तालय, पुणे यांच्याकडे आयुक्त (कृषि) यांनी सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मानवत तालुक्यातील मौ.ताडबोरगाव येथे कृषी सहाय्यक यांनी रुपये २० लाख चा निधी काम न करता उचलल्याबाबत**

**(२८) २२८३४ (१९-०८-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.ताडबोरगाव (ता.मानवत) येथे कृषी सहाय्यक यांनी रुपये २० लाख चा निधी काम न करता घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कृषी सहाय्यकावर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथराव खडसे (२६-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी तालुक्यातील डोंगरगाव येथे कोरडवाहू शेती अभियान कृषी विभागाचा ८० टक्के निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(२९) २२८४२ (०६-०८-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरगाव (ता.पाथरी) येथे कोरडवाहू शेती अभियान कृषी विभागाचा ८० टक्के निधी अखर्चित राहीला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अखर्चित राहिलेला निधी कोरडवाहू शेती अभियानासाठी वापरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) बाबत प्रश्नच उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या २४७२ संस्था असून, त्याकडून निकष पाळले जात नसल्याबाबत**

**(३०) २२८८३ (०६-०८-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या २४७२ संस्था असून, त्याकडून निकष पाळले जात नसल्याचे निदर्शनास आल्याने या सर्व संस्थांची चौकशी करण्यात येईल व अनियमीतता केली असल्यास त्यांची मान्यता काढून घेण्यात येईल अशी घोषणा अल्पसंख्यांक मंत्री यांनी माहे मे, २०१५ वा त्या दरम्यान केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अनियमितता करणा-या संस्थेची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त संस्थांमध्ये अनियमितता झाल्याने संस्थाची मान्यता काढून घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) शिक्षण निरिक्षक दक्षिण मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या अहवालानुसार काही अलपसंख्यांक शाळांच्या बाबतीत प्रथमदर्शनी ही बाब निदर्शनास आल्यानंतर ज्या अल्पसंख्यांक संस्थांच्या शाळांनी त्यांना असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या विद्यार्थ्यांना अल्प प्रमाणात प्रवेश दिले आहेत. अशा दक्षिण मुंबईतील अलपसंख्यांक संस्थांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच १६ अल्पसंख्यांक दर्जाच्या विद्यार्थ्यांना अलप प्रमाणात प्रवेश दिल्याबद्दल कारणे दाखवा नोटिस देवून त्यांच्याकडूल खुलासा मागविण्यात आला आहे. या संस्थांकडून प्राप्त झालेल्या खुलाशाच्या छाननी करण्यात येत असून या प्रकरणी शासन निर्णय अ.वि.वि.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/का-५, दि. २७.०५.२०१३ मधील विहित कार्यपध्दतीनुसार तसेच या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय , राष्ट्रीय अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था अधिनियम आणि संविधानातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी विधानसभा क्षेत्रात कोळसा खाणीमुळे अतिजड**
**वाहतुक मोठ्या प्रमाणावर होत असल्याबाबत**

**(३१) २३४४३ (०६-०८-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी येथे कोळसा खाणीमुळे रस्त्यावर अतिजड वाहतुक मोठ्या प्रमाणावर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या परिसरात अतीजड वाहतुकीमुळे रस्त्याला खड्डे पडून रस्त्याची दुर्दशा होत आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिजड वाहतूक रोखण्यासाठी पोलिस व आर.टी.ओ. विभागाला निदेश देण्याबाबत तसेच विशेष निधीची तरतुद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केलरी वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-१२-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) क्षमतेपेक्षा जास्त कोळशाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा शोध घेण्यासाठी उप.प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ यांचेकडील वायूवेग पथकामार्फत नियमितपणे तपासणी मोहिम

दाखविण्यात येते व दोषी वाहनांवर कारवाई केली जाते. एप्रिल, २०१२ ते जुलै २०१५ या कालावधीत दोषी आढळलेल्या ४३३ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पीकविम्यासाठी जालना जिल्ह्यास १९० कोटी १५ लाख रुपयांचा निधी प्राप्त होण्याबाबत**

**(३२) २३७९४ (०६-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यास पीकविम्यासाठी १९० कोटी १५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने जमा करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनास देण्यात आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती शेतकऱ्यांच्या खात्यावर निधी जमा करण्यात आला आहे तसेच शेतकऱ्यांच्या खात्यावर निधी जमा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०१४ मध्ये जालना जिल्ह्यातील ५.१६ लाख शेतक-यांनी योजनेत सहभाग घेतला होता. रु. १७.१४ कोटी विमा हप्ता भरुन ३.२० लाख हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले होते. त्यापैकी ५.१२ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले. त्यांना रु.१९०.१६ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली.
(२) सदर कंपनीमार्फत नुकसान भरपाईची रक्कम संबंधित बँकाकडे वर्ग करण्यात आली आहे व पात्र शेतक-यांच्या खात्यावर नुकसान भरपाई रक्कम तातडीने जमा करणेबाबत संबंधित बँकांना कंपनीमार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, या बाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना देखील शासनस्तरावरुन कळविण्यात आलेले आहे.
(३) राष्ट्रीय कृषि विमा योजनेंअंतर्गत खरीप हंगाम २०१४ मध्ये जालना जिल्हयाकरीता एकूण नुकसान भरपाई रकमेपैकी .१९०.१६ कोटी ५.१२ लाखार्थी शेतक-यांना दिनांक ११.६.२०१५ ते ३०.७.२०१५ दरम्यान अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळम्मावाडी प्रकल्पग्रस्तांना (जि.कोल्हापूर) २० ते २५ वर्षापूर्वी वाटप केलेल्या जमिनी जिल्हा पुनर्वसन विभागाने परत प्रशासनाच्या ताब्यात घेण्याची जिल्हा पुनर्वसन विभाकडून सुरू असलेली कारवाई स्थगिती करण्याबाबत**

**(३३) २३९३२ (११-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळम्मावाडी प्रकल्पग्रस्तांना (जि.कोल्हापूर) २० ते २५ वर्षापूर्वी वाटप केलेल्या जमिनी जिल्हा पुनर्वसन विभागाने परत प्रशासनाच्या ताब्यात घेण्याची जिल्हा पुनर्वसन विभाकडून सुरू असलेली कार्यवाही स्थगिती करावी या व इतर मागण्या संदर्भात दिनांक २५ मे, २०१५ रोजी नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून त्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनात कोणकोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत व मागण्यांबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) संदर्भिय निवेदनात पुढील मागण्या होत्या.

१) ज्यांनी आपली घरे दारे जमीन जुमला धरणात बुडु देणेस असलेला विरोध सोडून दिला व आपल्या जमिनी घरे दारे धरणासाठी दिली त्यांना २०.२५ वर्षापूर्वी कायदेशीर बाबींचा विचार करुन वाटप केलेल्या व सध्या त्यांच्या वहिवाटीस असलेल्या जमिनी काढुन घेण्याची जिल्हा पुनर्वसन अधिकारी कोल्हापूर यांची कार्य्रवाही स्थगीत करुन वाटप केलेल्या जमिनी कायमपणे प्रकल्पग्रस्तांकडे ठेवाव्यात.

२) प्रकल्पग्रस्तांचा वाटप केलेल्या जमिनी भोगवटदार वर्ग २ ऐवजी १ करण्यात याव्यात.

उपरोक्त मागणी १ बाबत काळम्मावाडी धरणग्रस्त संघटनेने मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १४६/२०१० च्या अनुषंगाने विभागीय आयुक्त पुणे यांनी दि. ०४.१०.२०१४ च्या पत्रान्वये, दुधगंगा प्रकल्पग्रस्तांना देय पर्यायी जमिनीपेक्षा जास्त क्षेत्र वाटप करण्यात आले असल्यास त्यांना सुनावणीची उचित संधी देवुन कार्यवाही करण्याच्या व संकलन अद्ययावत करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार संकलन नोंदवहीत कमी/जास्त वाटप झालेल्या प्रकल्पग्रस्तांची नोद घेण्यात आली असून एकुण १३४९ प्रकल्पग्रस्तांपैकी ३३६ प्रकल्पग्रस्तांना जास्त वाटप झाल्याचे आढळून आले आहे. याबाबत अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे सुनावण्या घेण्यात येत आहेत. त्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

I) सुनावनी घेवून अतिरिक्त जमीन वाटप झालेल्या ४७ खातेदारांची ३६ हे १० आर जमीन काढून घेण्यात आली आहे.

II) अतिरिक्त वाटपाबाबत सुनावणी घेतलेनंतर प्रत्यक्षात कमी वाटप आढळल्याने देय क्षेत्रात वाढ केलेले प्रकल्पग्रस्त ६०, क्षेत्र २९ हे. ०४ आर

III) वाटप क्षेत्र योग्य आढळलेले प्रकल्पग्रस्त ९७

IV) चोकशीवर प्रलंबीत प्रकलपग्रस्त खातेदार २२६

V) याशिवाय कमी वाटप झालेल्या ३३६ खातेदारांबाबत स्वतंत्र कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या दुसऱ्या मागणीच्या अनुषंगानं संबंधित तहसिलदारांकडून माहिती मागविण्यात आली असुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलालखेडा तालुका काटोल येथील फळबाग शेतकरी चार**
**वर्षापासुन अनुदानापासून वंचित असल्याबाबत**

**(३४) २३९५६ (१२-०८-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलालखेडा (ता.काटोल) परिसर येथील फळबाग शेतकरी २०११-१५ पर्यंतचे अनुदानापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ कोटी २५ लक्ष रु. अनुदान जिल्हा स्तरावरुन तालुका कृषी अधिकारी, नरखेड, यांना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीयकृत बँका अनुदान वाटपास विलंब करीत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी विभागाकडून सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास,चौकशीअंती राष्ट्रीयकृत बँकाकडून तात्काळ अनुदान वाटप करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-११-२०१५)** :(१) हे खरे नाही.

(२), (३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धानोरा (जिल्हा जळगांव) परिसरात केळीवर विषाणुजन्य "कुकुंम्बर मोझॅक" च्या प्रादुर्भाव**
**वाढल्याने, शेतकऱ्यांनी सुमारे ५० हजार केळीची झाडे उपटून फेकल्याबाबत**

**(३५) २४२७३ (११-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा (जिल्हा जळगांव) परिसरात केळीवर विषाणुजन्य "कुकुंम्बर मोझॅक" च्या प्रादुर्भाव माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारस वाढल्याने, शेतकऱ्यांनी सुमारे ५० हजार केळीची झाडे उपटून फेकली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरचा रोगावर आळा घालण्याकरिता तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०५)** :(१) अंशत: खरे आहे.

धानोरा (जिल्हा-जळगाव) परिसरात केळीवर विषाणुजन्य कुकुंम्बर मोझॅक या प्रादुर्भाव माहे एप्रिल, २०१५ चया सुमारास नविन केळी लागवड क्षेत्रात विखुरलेल्या स्वरुपात १ ते १.५ टक्के क्षेत्रावर आढळून आला असून अंदाजे २५,००० ते २६,००० झाडांचे नुकसान झाले आहे.

(२) या रोगाचा प्राथमिक प्रसार प्रादुर्भाव ग्रस्त कंदामार्फत होतो तर दुय्यम प्रसार मावा किडीच्या प्रजातीमार्फत होतो.

(३) सदर रोगांवर आळा घालण्यासाठी शेतकऱ्यांना या रोगावर जनजागृती करुन त्यावर उपाय योजना म्हणून रोगग्रस्त झाडे उपटून समुळ नष्ट करावी मावा किडीच्या नियंत्रणासाठी किटकनाशकाची फवारणी करावी तसेच केळी पिकात काकडी किंवा वर्गीय आंतरपिक न धेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत राज्यातील शेतकऱ्यांना कमी किंमतीत दर्जेदार खते पुरविण्याबाबत**

**(३६) २४३८१ (११-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत कमी किंमतीत दर्जेदार खते पुरविण्याकरीता पाचोरा, नांदेड, जालना, वर्धा, कोल्हापूर व रसायनी येथे खतांचे कारखाने कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाचोरा येथील खतांच्या कारखान्यात मनुष्यबळाचा आकृतिबंधानुसार ७६ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असतांना सध्या ४५ कर्मचारी कार्यरत असून पुढील दोन वर्षात २० कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या कारखान्यात कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कारखान्यात आकृतीबंधानुसार आवश्यक कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०९-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदरचा प्रस्ताव महामंडळाकडून दि.२५.०८.२०१५ रोजी शासनास प्राप्त झाला असून याबाबत छाननी प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये झालेल्या अनियमितता व गैरव्यवहराबात**

**(३७) २४४४९ (१२-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये झालेल्या अनियमितता व गैरव्यवहराबात माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीअंती अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) या प्रकरणी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडून तक्रारीस अनुलक्षून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेणे शक्य होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी एस.सी.पी., टी.एस.पी. व ओ.टी.एस.पी योजनांमध्ये सुधारणा करणेबाबत**

**(३८) २४७१७ (३१-०६-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी एस.सी.पी., टी.एस.पी. व ओ.टी.एस.पी योजनांमध्ये सुधारणा करणेबाबत मा. कृषी मंत्री यांना दिनांक ९ जून, २०१५ रोजीच्या सुमारास लोकप्रतिनिधींनी एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनात नमूद करण्यात आलेल्या आवश्यक सुधारणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-१२-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.

टी.एस.पी, व ओ.टी.एस.पी. योजनंतर्गत देय घटकांच्या अनुदानामध्ये व लाभार्थ्यांच्या उत्पन्न मार्यादेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांसाठी शासनामार्फत करोडो रुपयांचा अनुदानाच्या योजना राबविण्याबाबत**

**(३९) २४७७१ (०६-०८-२०१५). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांसाठी शासनामार्फत करोडो रुपयांचा अनुदानाच्या योजना राबविण्यात येत असून या योजनांचा आजतागायत १० टक्के शेतकरी सुध्दा सक्षम व समृध्द दिसून न आल्याने अशा अनुदानाच्या योजना बंद करुन सदर अनुदानाची रक्कम शेतक-यांना देण्यात येणा-या कर्जाच्या व्याज माफीसाठी उपयोगात आणून शेतक-यांना बिनव्याजी स्वरुपात आर्थिक कर्ज पुरवठा करण्याची मागणी किसान बिरादरी (जि.नांदेड) या संघटनेने मार्फत मा.मुख्यमंत्री, मां. मंत्री (कृषी) मा. मंत्री (महसूल व पुनर्वसन) यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-११-२०१५) :**(१) निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत शेतक-यांना कृषि तंत्रज्ञान, चांगल्या दर्जाची बियाणे, खते व किटकनाशके यासाठी अनुदान देण्यात येते. त्यामुळे शेतक-यांच्या उप्तादन व उत्पादकतेत गेल्या १० वर्षाच्या कालावधीत मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अनुदानावरील योजना बंद करण्याच्या प्रश्न उदभवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) तालुक्यात शेततळे खोदण्यात लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार.**

**(४०) २४८९५ (१७-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात शेततळे खोदण्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये पहिल्याच आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व तदनुषंगांने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०९-२०१५) :**(१) व (२) ता.वाडा (जि.पालघर) येथे सन २०१४-१५ या वर्षात विविध योजनांतर्गत २८ शेततळ्यांची कामे करण्यात आली यामध्ये कोणत्याहीप्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत

**(४१) २५१७९ (०६-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अल्पसंख्याक हजारो विद्यार्थ्यांना मागील तीन वर्षात शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५) :**(१) प्रि.मॅट्रीक शिष्यवृत्तीबाबत अंशत: खरे आहे.
अलपसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी राज्य शासन पुरस्कृत उच्च व्यावसायिक व इ. १२ वी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती तसेच केंद्र शासन पुरस्कृत प्रि.मॅट्रीक, पोस्ट-मॅट्रीक, व मेरीट कम मीन्स शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. यापैकी फक्त प्रि-मेट्रीक शिष्यवृत्ती योजनेंर्गतच्या काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यास तांत्रिक बाबींमुळे विलंब झाला असून उर्वरित सर्व शिष्यवृत्तीचे विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आले आहे.
(२) विद्यार्थ्यांना बँक खात्याबाबत ऑनलाईन माहिती घेऊन प्रि-मेट्रीक शिष्यवृत्ती वाटपाचे नियोजन संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण यांच्यामार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर जिल्ह्यात दारुबंदीच्या मागणीबाबत

**(४२) २५२०९ (०३-०७-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदी करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त निर्णयामुळे राज्य शासनाचा किती महसूल बुडणार आहे व परवानाधारक दारु विक्रेत्यांचे पुनर्वसन कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाविरुध्द चंद्रपूर जिल्ह्यातील दारु विक्रत्या महिलांनी मा.वित्त व नियोजन मंत्री यांच्या निवासस्थानासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४)तसेच अहमदनगर जिल्ह्यातही दारुबंदी करण्याची मागणी जिल्ह्यातील नागरिकांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-१०-२०१५) :**(१) होय.
(२) उक्त निर्णयमुळे राज्य शासनाचा अंदाजे रु. ३६० कोटीचा महसूल बुडणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व किरकोळ अनुज्ञप्त्यांच्या स्थलांतराबाबत संबंधित अनुज्ञप्तीधारकाने विनंती केल्यास वर्धा, गडचिरोली तसेच चंद्रपूर जिल्हे वगळून राज्यात अन्य जिल्ह्यामध्ये प्रचलित नियम व मार्गदर्शक तत्वे यांच्या अधीन राहून त्यांच्या विचार करण्यात येईल, अशा सूचना शासन परिपत्रक, गृह विभाग, दि. १० मार्च, २०१५ अन्वये देण्यात आल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) होय.तथापि अहमदनगर जिल्ह्यात दारुबंदी करयण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांचे पिक विमा योजनेचे ६५० कोटी रुपये थकीत असल्याबाबत**

**(४३) २५७१५ (०८-०९-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांचे पिक विमा योजनेचे ६५० कोटी रुपये थकीत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पिकविम्याचे ६५० कोटी तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५) :**(१) व (२) राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत खरीप २०१४ मध्ये राज्यातील ४४.७९ लाचा शेतकऱ्यांनी रु. १७६.२४ कोटी विमा हप्ता भरुन २८.०८ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षीत केले होते. त्यापैकी ३४.८७ लाख शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले. पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना रु. १५९५.६५ कोटी नुकसान भरपाई भारतीय राज्य शासनाच्या हिश्श्याची रु. ६९०.७४ कोटी, केंद्र शासनाच्या हिश्श्याची रु.६९०.७४ कोटी आणि

भारतीय कृषी विमा कंपनीच्या हिश्श्याची रु. २१४.१७ कोटी इतकी रक्कम होती. भारतीय कृषि विमा कंपनीने सदर नुकसान भरपाईची रक्कम रु. १५९५.६५ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यावर संबंधित बँकामार्फत वर्ग केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यात जून-जुलै, २०१४ च्या खरीप हंगामासाठी शासनाकडून जिल्हा कृषी कार्यालयास बी-वियाणे पिकांवर फवारण्याची साहित्य वितरण न झाल्याबाबत**

**(४४) २६१०४ (११-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात जून-जुलै, २०१४ च्या खरीप हंगामासाठी शासनाकडून जिल्हा कृषी कार्यालयास बी-वियाणे पिकांवर फवारण्याची औषधी, शेती औजारे व खते प्राप्त झाली होती हे साहित्य तालुका कृषी कायार्लयास पाठवून त्याचे वितरण शेतकऱ्यांना करणे आवश्यक होते मात्र ते झाले नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात मुदत संपण्यापूर्वी ते गोदामाच्या समोरच फेकून दिले असल्याचे निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाखोचे खत-बी उघड्यावर असूनही याकडे शासनाचे दुल र्क्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-१२-२०१५) :**(१), (२), व (३) हे खरे नाही.

तालुका कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी , बीड यांचे कार्यालय TCD च्या गोडावून मध्ये आहे. या कार्यालयाच्या रंग-रंगोटीसाठी गोडावूनमधील औषधे तात्पुरत्या स्वरुपात बाहेर ठेवण्यात आली होती. काम पूर्ण होताच औषधे गोडावूनमध्ये ठेवण्यात आली व त्यानंतर पात्र लाभार्थीनी वाटप करण्यात आली आहेत, त्यामुळे निविष्ठा शिल्लक नाहीत.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ तालुक्यातील पवना धरणाकरीता १९६५ ते १९७० या कालावधीत भूसंपादन होऊन आजवर धरणग्रस्तांचे पुर्नवसन न झाल्याबाबत**

**(४५) २६२६६ (११-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील पवना धरणाकरीता १९६५ ते १९७० या कालावधीत भूसंपादन होऊन आजवर धरणग्रस्तांचे पुर्नवसन झाले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०११ एकर क्षेत्र आवश्यकता नसताना ते संपादित करण्यात आले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(३) असल्यास, १२०३ शेतक-याचे पुर्नवसन करण्याचा १९६९ सालचा शासनाचा आदेश असूनही केवळ ३४० शेतक-यांचे पुर्नवसन झाले हेही खरे आहे काय,
(४) उक्त प्रकरणी उर्वरित शेतक-यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०१-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे..
पवना प्रकल्पाने बाधीत १२०३ प्रकल्पग्रस्तांपैकी ३४० प्रकल्पाग्रस्तांनर पर्यायी जमीन वाटप करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) पवना प्रकल्प हा जलकुंभ असल्याने त्यास लाभक्षेत्र नाही त्यामुळे उपलब्ध शासकीय जमिनीपैंकी खेड व मावळ तालुक्यात ३४० प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीनीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच पवना प्रकल्पाचे बाधीत परिमंडळातील पुररेषेच्या बाहेर असलेल्या १०११ एकर क्षेत्रापैकी प्रत्येक खातेदारास खास बाब म्हणुन १ पर्यायी जमिन वाटप करण्यास दि. ०७.०७.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती व त्याद्वारे उर्वरित ८६३ प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचे वाटप करण्यासाठी उप विभागीय अधिकारी, मावळ जि.पुणे यांना प्रारधिकृतही करण्यात आले होते. तथापि, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ४६८८/२०१३ दाखल झाली असुन सदरील याचिकेत मा. उच्च न्यायालयाने वाटप कार्यवाहीची परिस्थिती “जैसे थे” ठेवणेचे आदेश दि. ०३.१०.२०१३ रोजी दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विद्यापीठांमधील रोजंदार मजूर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(४६) २६७४५ (०६-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विद्यापीठांमधील रोजंदार मजूर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम / नियमित करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयानुसार राज्यातील कृषी विद्यापीठांमधील रोजंदार मंजूर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम / नियमित करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) होय.

(२) शासनाने शासन निर्णय दिनांक २४/०७/२०१५ रोजी निर्गमित केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाने कोरडवाहू शेती अभियान राबविण्याबाबत**

**(४७) २६९५० (१२-०८-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कोरडवाहू शेती अभियानांतर्गत राज्यातील ४०३ गावांमध्ये हे अभियान राबविण्याचे ठरविले आहे, त्यासाठी २००० कोटी रुपये खर्च होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरडवाहू शेतीच्या संदर्भात राज्याच्या कोरडवाहू शेती अभियानाचे मा.अध्यक्ष यांनी स्वारस्या अभावी त्यांचे पदाचा राजीनामा दिला हे खरे आहे काय, आणि त्यांचे ऐवजी पुन्हा अध्यक्षांची नेमणूक न करता अशासकीय समितीच बरखास्त केली हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनास कोरडवाहू क्षेत्र विकासासाठी कोरडवाहू शेती अभियान राबवावयाचे नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरडवाहू शेती अभियानांतर्गत राज्यातील ४०३ गावांमध्ये अभियान राबविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) होय हे खरे आहे.

(२) अंशत खरे आहे.

कोरडवाहू शेती अभियानाचे अंमलबजावणी करण्यासाठी डॉ.वाय.एस. थोरात यांची दि.०७.०६.२०१३ या शासननिर्णयान्वये कोरडवाहू शेती अभियानाचे कार्याध्यक्ष म्हणून शासनाने नियुक्ती केली होती. त्यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला नसून दि.०१.१०.२०१४ च्या शासननिर्णयान्वये कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना अधिक परिणामकारकरित्या राबविणे व विविध योजनांचे पुनर्विलोकन करण्याच्या अनुषंगाने गठीत केलेल्या समितीमधील सर्व अशासकीय सदस्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. नव्याने नियुक्ती करावयाच्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. नव्याने नियुक्ती करावयाच्या अशासकीय सदस्यांची नावे शासन स्तरावरुन लवकरच निर्गमित करण्यात येणार आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यामध्ये सन २०१२-१३ पासून कोरडवाहू शेती अभियान राबविण्यात येत असून सन २०१२-१३ मध्ये या अभियानासाठी रु.८०.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. सन २०१३-१४ मध्ये शासनाने एकूण २७१ गाव कोरडवाहू शेती अभियानांतर्गत समाविष्ट करण्यास मान्यता देऊन रु.१२०.०० कोटी निधी उपलब्ध करुन दिला होता. सन २०१४-१५ मध्ये राज्यातील ३४७ तालुक्यातील एकूण ४०३ गावांमध्ये कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली व रु. ११२.५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

सन २०१५-१६ करिता सदर अभियानासाठी रु.५०.०० कोटी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य बियाने महामंडळाने गहु बिजोत्पादक शेतक-यांकडून सन २०१४-१५ मध्ये गहू उत्पानाची खरेदी न केल्याबाबत**

**(४८) २७३०९ (२१-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य बियाने महामंडळाने गहु बिजोत्पादक शेतक-यांकडून सन २०१४-१५ मध्ये गहू उत्पानाची खरेदी न केल्यामुळे महाराष्ट्र राज्य बियाने महामंडळाने प्रति क्विंटल रुपये १००० हजार नुकसान भरपाई शेतक-याना दयावी अशी मागणी भागधारक शेतक-यांकडून होत असल्याचे माहे मे, २०१५ अथवा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांनी प्रति क्विंटल रुपये १००० हजार नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-११-२०१५) :**(१) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने , बुलढाणा जिल्ह्यामध्ये सन २०१४-१५ च्या रब्बी हंगामामध्ये गहू पीक खाणाच्या बिजोप्पादन कार्यक्रम राबविलेला होता हे खरे आहे. तथापि, महाबीज व बिजोत्पादक शेतकरी यांच्यामध्ये झालेल्या बिजोत्पादन शेतकरी यांच्यामध्ये झालेल्या बिजोत्पादन कार्यप्रणाली करारनाम्यानुसार बिज परिक्षणात अपात्र ठरणारे बियाणे महाबीजकडून स्विकारले जात नाही, तसेच त्याकरीता नुकसान भरपाईही दिली जात नाही.

उक्त प्रकरणी नुकसान भरपाईची मागणी करण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेतकऱ्यांकडून जादा वापर होत असलेल्या डीएपी या खताच्या दरात वाढ झाल्याबाबत**

**(४९) २७५४४ (१२-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांकडून जादा वापर होत असलेल्या डीएपी या खताच्या दरात माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ८० रुपयांनी वाढ करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने खताचे दर निश्चिती केल्यानंतर डीएपी खताच्या दरात वाढ करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, खताचे भाव स्थिर ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मुलद्रव्याधाकरीत अनुदान योजनेअंतर्गत (एनबीएस) खताचे अनुदान केंद्र शासन ठरविते. युरिया खतांचे दर केंद्र शासनाने नियंत्रित केल्यामुळे ते स्थिर आहेत, परंतु, इतर खतांच्या किमती ठरविण्याचे अधिकारी उत्पादक कंपन्यांना दिलेले आहेत. त्यामुळे खत उत्पादक कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातील खतांच्या व कच्च मालाच्या किंमतीमध्ये होणऱ्या वाढ/घटी नुसार विक्री किंमतीमध्ये बदल करतात.

(३) केंद्र शासन रासायनिक खतांना अनुदान देत असल्याने अनुदानित खतांच्या किंमती ठरविण्याचे कोणतेही अधिकार राज्य शासनास नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात भात, बाजरी, सोयाबीन आणि कापूस या पिकांखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात असूनही हवामानावर आधारित पीक विमा योजनेतून नाशिक जिल्ह्याला डावलण्यात आल्याबाबत

**(५०) २७७४९ (१७-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात भात, बाजरी, सोयाबीन आणि कापूस या पिकांखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात असूनही हवामानावर आधारित पीक विमा योजनेतून नाशिक जिल्ह्याला डावलण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील केवळ १२ जिल्ह्यांमध्येच उक्त योजना राबविण्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिकसह राज्यातील उर्वरित जिल्ह्यांचा हवामानावर आधारीत पीक विमा योजनेत समावेश करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-१२-२०१५) :**(१) हवामान आधारित पीक विमा योजना ही राज्यात पथदर्शी स्वरुपात काही निवडक जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

(२) खरीप हंगाम २०१४ मध्ये सदर योजना केवळ १५२ जिल्ह्यातच राबविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) योजनेची उपयुक्तता विचारात घेऊन नाशिकसह राज्यातील उर्वरित जिल्ह्यात हवामान आधारित पीक विमा योजना राबविण्याबाबत भविष्यात विचार करण्यात येईल.
(४) हवामान आधारित पीक वीमा ही योजना केवळ पथदर्शी स्वरुपातच राबविण्यात येत आहे, त्यामुळे ती सर्व राज्यात राबविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.